पंचायती राज समिती

(२००२-२००३)

(दहावी महाराष्ट्र विधानसभा)

पहिला अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या सन १९९४-९५ च्या पहिल्या अहवालातील कोल्हापूर व नागपूर जिल्हा परिषदेच्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

(सदर अहवाल दिनांक ११ डिसेंबर, २००३ रोजी विधानसभेच्या / विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२००३

पंचायती राज समिती

(२००२-२००३)

(दहावी महाराष्ट्र विधानसभा)

पहिला अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या सन १९९४-९५ च्या पहिल्या अहवालातील कोल्हापूर व नागपूर जिल्हा परिषदेच्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

पंचायती राज समिती (२००३ - २००४)

(दिनांक २९ ऑक्टोबर २००३ पासून)

समिती प्रमुख

(१) श्री.राजन पाटील, वि.स.स.

(सदस्य)

(२) श्री.अब्दुल रशीद ताहीर-मोमीन, वि.स.स.
(३) श्री.नरेशचंद्र ठाकरे, वि.स.स.
(४) श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
(५) श्री.अनंतराव देवसरकर, वि.स.स.
(६) श्री.भाऊराव पाटील, वि.स.स.
(७) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
(८) श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स.
(९) श्री.तुकाराम तुपे, वि.स.स.
(१०) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स.
(११) श्री.जे.पी.गावीत, वि.स.स.
(१२) श्री.गणपत कदम, वि.स.स.
(१३) श्री.गुलाबराव पाटील, वि.स.स.
(१४) श्री.ज्ञानेश्वर धाने-पाटील, वि.स.स.
(१५) श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.
(१६) श्री.रामकृष्ण दोधा पाटील, वि.स.स.
(१७) श्री.खोमेश्वर रहांगडाळे, वि.स.स.
(१८) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.स.स.
(१९) श्री.रामचंद्र नावंदिकर, वि.स.स.
(२०) श्री.मधुकर कुकडे, वि.स.स.
(२१) श्री.चंद्रकांत बटेसिंह रघुवंशी, वि.प.स.

(२२) श्री.मदन पाटील, वि.प.स.

(२३) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

(२४) श्री.बळवंतराव ढोबळे, वि.प.स.

(२५) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.विलास पाटील, प्रधान सचिव

(२) श्री.अ.ना.कळसे, सचिव

(३) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव

(४) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव

टीप : श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, वि.प.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त जागेवर श्री.मदन पाटील, वि.प.स. यांची दिनांक २१ नोव्हेंबर २००३ रोजी समिती सदस्य म्हणून मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा प्रमुख, समितीने आपल्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन समितीच्या सन १९९४-१९९५ च्या पहिल्या अहवालातील कोल्हापूर व नागपूर जिल्हा परिषदेच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालासंबंधी शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईसंबंधी पहिला अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

समितीचा पहिला अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांना दिनांक १० एप्रिल २००० रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबंधात जारी केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी परिशिष्ट "अ" मध्ये समाविष्ट केले आहेत. शासनाकडून आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक १२, १८ जून २००३ व २ जुलै २००३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये दिले आहे.

तथापि, त्या अहवालातील समितीच्या शिफारशींवर शासनाने केलेली कारवाई विचारात घेतल्यानंतर समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केले आहेत.

श्री.एस.एस.हुसैन, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.नवीन कुमार, सचिव, सार्वजनिक आरोग्य, विभाग, श्री.एस.एस.मोमिन, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती), श्री.व्ही.पी.बोरगे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते), श्री.वासुदेव गोरडे, सचिव, अतिरिक्त कार्यभार, महिला व बालकल्याण विकास विभाग, श्री.जे.एम.फाटक, सचिव, शालेय शिक्षण विभाग आणि श्री.प्रभाकर देशमुख मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर, श्री.कुणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर यांनी समितीच्या कामकाजात दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभारी आहे. तसेच श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा हे समितीच्या कामकाजात सहाय्य करण्यासाठी समितीच्या बैठकींना उपस्थित होते. समितीच्या कामकाजात सहाय्य केल्याबद्दल समिती त्यांचीदेखील आभारी आहे.

समितीने हा अहवाल दिनांक २९ नोव्हेंबर २००३ रोजी विचारात घेतला व संमत केला.

विधान भवन
नागपूर/मुंबई
दिनांक २९ नोव्हेंबर २००३

श्री.राजन पाटील,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)		पृष्ठ क्रमांक (३)
१	डांबर खरेदीबाबत जिल्हा परिषद कोल्हापूर. (लेखा प.क्र.३.१४६)	..	१
२	मडिलगे तालुका भुदरगड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधणे. (लेखा प.क्र.३.१४७), जि.प.,कोल्हापूर.	..	३
३	प्रशासकीय इमारत बांधकाम (लेखा प.क्र.३.१४९) जि.प.,कोल्हापूर.	..	५
४	सायकली पुरविणेबाबत (लेखा प.क्र.३.३३) जि.प.,नागपूर.	..	७
५	प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अंडी वाटपाबाबत (लेखा प.क्र.३.८५) जि.प.,नागपूर.	..	१०
६	बनपूरी-नगरधन रस्त्याचे बांधकामातील अनियमितता (लेखा प.क्र.३.१६४) जि.प.,नागपूर.	..	१३
७	पाटणसवंगी वाकीरोड पृष्ठभागाच्या मजबुतीकरणाबाबत (लेखा प.क्र.३.१६५) जि.प.,नागपूर.	..	१७
	परिशिष्ट अ--शासनाचे आदेश व परिपत्रके.	..	१८
	परिशिष्ट ब--समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त.	..	२०

एक : डांबर खरेदीबाबत. (जिल्हा परिषद, कोल्हापूर) (३.१४६)

कोल्हापूर जिल्हा परिषदेने सन १९९० ते १९९३ या ३ वर्षांच्या कालावधीत हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून डांबर खरेदीसाठी एकूण रुपये १५.१२ लाख इतकी रक्कम भरली होती. त्यापैकी अद्यापपर्यंत फक्त १३.८७ लाखाचे डांबर आले आहे व कंपनीकडून उर्वरित डांबर न पुरविल्यामुळे रुपये १.२५ लाख इतकी रक्कम त्यांच्याकडे पडून आहे. सदरहू जिल्हा परिषदेने त्यानंतर भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, गोवा व इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांच्याकडून डांबर खरेदीसाठी भरलेल्या अग्रीम रकमेपैकी अनुक्रमे रुपये ३८,२१७ व रुपये २७,३४२ इतकी रक्कम सदरहू कंपन्यांनी जिल्हा परिषदेला परत करणे आवश्यक आहे. सदरहू वसुलीसाठी जिल्हा परिषदेने उक्त कंपन्यांना वारंवार पत्रे पाठवून तसेच प्रत्यक्ष अधिकारी पाठवूनही उर्वरित रकमांची वसुली होऊ शकलेली नाही, असे समितीला दिसून आले.

वास्तविक डांबर खरेदीसाठी सदरहू कंपन्यांकडे अग्रीम रक्कम भरताना सदरहू कंपन्यांबरोबर जिल्हा परिषदेने करारनामा करणे आवश्यक होते. तथापि, तसा करारनामा करण्यात आला नव्हता असे साक्षीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. याचा अर्थ सदरहू अधिकाऱ्यांनी ही एक अनियमितता केलेली आहे. त्यामुळेच सदरहू कंपन्या रक्कम भरुनही मागणीप्रमाणे डांबराचा पूर्ण पुरवठा करीत नाहीत. तसेच उर्वरित रक्कमही परत करत नाहीत अशी स्थिती निर्माण झाल्याचे समितीला दिसून येते. सदरहू कंपन्यांनी मागणीप्रमाणे डांबराचा पुरवठा करणे हे त्यांचे काम होते. परंतु तसे त्यांनी केले नाही म्हणून उर्वरित रकमांच्या वसुलीसाठी काही काळ पाठपुरावा करुन रकमांची वसुली होत नाही असे दिसताच जिल्हा परिषदेने सदरहू कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक होते. तथापि, अशी कायदेशीर कारवाई न करता संबंधित अधिकारी केवळ वसुलीसाठी पाठपुरावाच करत राहिले आणि रकमांच्या वसुलीसाठी पाठपुरावा करण्यातच ५ वर्षांचा कालावधी निघून गेला हे लक्षात घेऊन समितीने आपल्या पहिल्या अहवालात पुढीलप्रमाणे शिफारस केली होती :-

जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने संबंधित कंपन्यांवर रकमांच्या वसुलीबाबत कायदेशीर कारवाई करणे गरजेचे होते. निदान आता तरी जिल्हा परिषदेने सदरहू कंपन्यांकडून येणे असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी विनाविलंब कायदेशीर कारवाई करावी व केलेल्या करवाईची माहिती समितीला विनाविलंब कळविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

या शिफारशीसंबंधात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास विभागाने असे नमूद केले की, हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून रु.१,२५,४९८ इतकी रक्कम येणे बाकी होती. सदर रक्कम त्वरीत वसूल व्हावी.

याकरिता ठोस कारवाई म्हणून जिल्हा परिषदेने वकीलांमार्फत कंपनीला कायदेशीर नोटीस दिनांक २१ नोव्हेंबर १९९९ रोजी दिली होती. त्यामुळे सदर कंपनीने रु.१,२५,४९८ इतकी रक्कम चेकद्वारे दिनांक २२ जानेवारी २००० रोजी जिल्हा परिषदेकडे भरणा केली आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनकडून रु.२७,३४२

इतकी रक्कम येणे बाकी होती. सदर रक्कम वसूलीसाठी जिल्हा परिषदेने दिनांक २१ नोव्हेंबर १९९९ रोजी कंपनीला वकीलांमार्फत कायदेशीर नोटीस पाठविली होती. त्यामुळे कंपनीने रु.२७,३४२ इतकी रक्कम दिनांक ७ जुलै २००० रोजी जिल्हा परिषदेकडे जमा केली आहे.

भारत पेट्रोलियम कंपनीकडे जिल्हा परिषदेने डांबर खरेदीसाठी अग्रिम म्हणून रु.३,५६,१५८ इतकी रक्कम भरणा केली त्यापैकी रु.३१,२३३ इतक्या रकमेचे डांबर कंपनीने पुरवठा केले. उर्वरित रकमेचे डांबर न पुरविल्याने व ती रक्कम जिल्हा परिषदेला परत करण्यासाठी कंपनीला जिल्हा परिषदेच्या वकीलांमार्फत दिनांक २९ जानेवारी १९९९ व दिनांक २६ डिसेंबर २००० रोजी कायदेशीर नोटीसा देण्यात आल्या होत्या. तथापि, कंपनीने रु.३,५५,७७४ इतक्या रकमेचे डांबर पुरवठा केले आहे व कंपनीकडे फक्त रु.३८४ इतकी रक्कम शिल्लक आहे असे कळविले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेने सर्व कागदपत्रांची सखोल तपासणी केली असता असे दिसून आले की, कंपनीच्या म्हणण्यानुसार सर्व डांबर जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले आहे. कंपनीने शिल्लक रक्कम रु.३८४ दिनांक ७ डिसेंबर २००० रोजी जिल्हा परिषदेकडे भरणा केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती वरुन दिसून येते की, हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनी, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन व भारत पेट्रोलियम कंपनी यांच्याकडून येणे असलेली सर्व रक्कम कोल्हापूर जिल्हा परिषदेस प्राप्त झाली आहे.

उपरोक्त साक्षीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केलेली आहे हे जाणून घेण्यासाठी दिनांक १२ जून २००३ रोजी सचिव ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली, साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीसमोर पुढील प्रमाणे माहिती दिली :-

हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून डांबराचा पुरवठा कमी केल्यामुळे रु.१,२५,४९८ वसूल करावयाचे होते. यासाठी जिल्हा परिषदेने पत्रव्यवहार केला परंतु त्यांच्या पत्रांना हिंदुस्थान पेट्रोलियम कपंनीकडून दाद न मिळाल्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत कायदेशीन नोटीस पाठवून कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर त्यांचेकडून शिल्लक रक्कम रुपये १,२५,४९८/- येणे बाकी होती, ती त्यांनी २२ जानेवारी २००० रोजी जिल्हा परिषदेकडे भरणा केली आहे. तसेच भारत पेट्रोलियम कंपनीकडून डांबराचा पुरवठा कमी केल्यामुळे उर्वरित ३८४/- रुपयांची रक्कम कंपनीने जिल्हा परिषदेकडे दिनांक ७ जानेवारी २००० रोजी भरणा केलेली आहे. आता या दोन्ही कंपन्याकडून येणे रक्कम संपूर्ण वसूल झालेली आहे.

<u>अभिप्राय व शिफारस :</u>

हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना डांबर न पुरविल्यामुळे रुपये १ लाख २५ हजार ४९८ इतकी रक्कम येणे बाकी होती आणि भारत पेट्रोलियम, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या सर्वांकडून डांबर पुरवठा संबंधिच्या रक्कमा वसुलीसाठी पाठपुरावा करण्यातच पाच वर्षांचा कालावधी कायदेशीर कारवाई न करता निघून गेला. त्यामुळे संपूर्ण रक्कम विलंबाने वसूल केल्याच्या कार्यवाहीबद्दल असमाधान व्यक्त करुन समितीने कोणताही अभिप्राय व्यक्त केला नाही.

दोन : मडिलगे, तालुका भुदरगड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधणे. जि.प.,कोल्हापूर. (३.१४७)

समितीसमोर आलेल्या एकूण माहितीवरून असे दिसून येते की, मडिलगे, तालुका हातकणंगले येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेने जानेवारी १९८६ मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषदा, पंचायत समित्या अधिनियमानुसार १९६१ चे कलम ५४ (२) चा वापर केला. सदरहू कामासाठी फेब्रुवारी १९८६ मध्ये निविदा स्वीकारण्यात येऊन कार्यारंभाचे आदेश मात्र मार्च १९८६ मध्ये देण्यात आले. रुपये ३,३३,३१५/- एवढे अंदाजपत्रक असलेल्या या कामाचे एकूण नऊ भाग पाडण्यात आले. तथापि, प्रत्यक्षात हे काम एकाच कंत्राटदाराला देण्यात आले. साक्षीच्या वेळी काम लवकर व्हावे हा एकमेव उद्देश असल्यामुळे कामाचे भाग पाडण्यात आले आहेत असे समर्थन करण्याचा जिल्हा परिषदेने प्रयत्न केला. तथापि, हे समर्थन समितीला न पटणारे आहे. कामाचे असे भाग पाडल्यामुळे जिल्हा परिषदेचा उद्देश सफल झालेला नाही आणि त्यामुळे या कामात जवळपास रुपये ३,००,०००/- चा जादा खर्च झालेला आहे. प्रत्यक्षात हे काम १९९२ मध्ये पूर्ण झाले व त्यासाठी ६,४२,०००/- रुपये झालेला आहे.

जिल्हा परिषदेला आरोग्य केंद्र बांधण्यास उपलब्ध झालेला निधी वापर न होता परत जाऊ नये म्हणून तसेच काम लवकर व्हावे या चांगल्या उद्देशाने महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ५४ (२) चा वापर कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी केला हे योग्य आहे. तथापि, काम लवकर व्हावे हा त्यामागील उद्देश सफल झालेला नाही कारण मार्च १९८६ मध्ये सुरु झालेले काम सन १९९२ मध्ये पूर्ण झाले आहे. या कामास जो ६ वर्षांचा विलंब झाला त्याबाबत समिती तीव्र नापसंती **व्यक्त करून पुढीलप्रमाणे आपल्या पहिल्या अहवालावर शिफारस केली होती. या प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला विनाविलंब कळविण्यात यावी अशी शिफारस करीत आहे.**

या शिफारशी संबंधात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास विभागाने असे नमूद केले की, समितीच्या शिफारशींनुसार संबंधित अधिकारी श्री.एच.टी.गायकवाड, उप अभियंता व श्री.व्ही.बी.देसाई, कनिष्ठ अभियंता यांना जिल्हा परिषदेने नोटीसा बजावल्या होत्या. तथापि, सदर प्रकरण १९८६ मधील आहे.

श्री.एच.टी.गायकवाड, उप अभियंता हे दिनांक २८ फेब्रुवारी १९९३ रोजी सेवानिवृत्त झाले व श्री.व्ही.बी.देसाई, कनिष्ठ अभियंता हे दिनांक ३१ जानेवारी १९९६ रोजी सेवानिवृत्त होऊन दिनांक ३० जून २००२ रोजी निधन पावले. सदर प्रकरण सेवानिवृत्तीच्या तारखेच्या चार वर्षांपुर्वीचे आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती वेतन) नियम. १९८२ मधील नियम २७ (२) (ब) (II) २७ (३) मधील तरतुदींनुसार या अधिकाऱ्यांविरुद्ध कार्यवाही करता येणार नाही.

शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीबाबत समितीचे समाधान न झाल्यामुळे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक १२ जून २००३ रोजी समितीने सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिव, ग्रामविकास यांनी अशी माहिती दिली की, प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीच्या बांधकामाचे वाटप करण्यासाठी जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ५४ (२) चा वापर करण्यात आला. परंतु आरोग्य केंद्र इमारतीच्या बांधकामाचे वाटप केल्यामुळे या कामास सुमारे रु. तीन लाख जादा खर्च झालेला आहे. या प्रकारास श्री.जी.बी.देसाई व श्री.एस.टी.गायकवाड हे दोन अधिकारी जबाबदार होते. या दोन अधिकाऱ्यांपैकी एक अधिकारी मृत्यू पावला असून दुसरा अधिकारी सेवानिवृत्त होऊन चार वर्षांचा कालावधी लोटलेला आहे. त्यामुळे कारवाई केलेली नाही. बांधकाम करण्यास विलंब झाल्याप्रकरणी जबाबदार असलेल्या ठेकेदाराला काळ्या यादीमध्ये घेण्याबाबत कारवाई करावी असे समितीने निदेश देऊन इमारतीच्या बांधकामाचा खर्च वाढण्याबाबत त्यावेळी संपूर्ण चौकशी करण्यात आली होती काय अशी समितीने विचारणा केली असता, सन १९९३ साली या प्रकरणी संपूर्ण चौकशी झाली आहे किंवा नाही याची तपासणी करुन समितीला कळविण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर यांनी समितीला सांगितले.

<u>अभिप्राय व शिफारस :</u>

साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीबाबत समितीचे मुळीच समाधान झाले नाही. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकामास सहा वर्षे विलंब झाला आणि रुपये तीन लाख जादा खर्च वाढला या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्याचा अहवाल समितीला विनाविलंब कळविण्यात यावा अशी समितीने शिफारस केली असतांना आणि बांधकाम ठेकेदारास काळ्या यादीमध्ये समावेश करावे असे निदेश समितीने देऊनसुद्धा अद्याप संबंधितांवर कोणतीही कारवाई पूर्ण होऊ शकलेली नाही. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सन १९९२ मध्ये सहा वर्षांच्या विलंबाने पूर्ण झाले या बांधकाम प्रकरणी जबाबदार असलेले संबंधित उप अभियंता, श्री.एच.टी.गायकवाड हे दिनांक २८ फेब्रुवारी १९९३ मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी त्यांच्याविरुद्ध कारवाई करणे आवश्यक होते. परंतु मुद्दाम चौकशी करण्यास विलंब लावण्यात आला असे समितीचे मत आहे. जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासंबंधी हेतुपुरस्सर अक्षम्य दिरंगाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी पंचायती राज समितीने केलेल्या शिफारशींची जिल्हा परिषदेने गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. तसेच अक्षम्य दिरंगाईची पुनरावृत्ती घडू नये म्हणून संबंधित जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घेऊन तातडीने वेळीच प्रकरणे निकालात काढावीत.

तीन : प्रशासकीय इमारत बांधकाम जि.प.,कोल्हापूर. (३.१४९)

कोल्हापूर जिल्हा परिषदेने १९९० मध्ये प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी निविदा मागवून ९ टक्के जादा दराने निविदा मंजूर करुन इमारतीचे बांधकाम केले व या कामावर एकूण रुपये १,५१,७४,१५२ इतका खर्च झालेला आहे.

इमारतीच्या बांधकामासाठी लागणारे सिमेंट हे निविदेतील शर्तीप्रमाणे कंत्राटदारानेच खरेदी करावयाचे होते. त्यामुळे त्याने ते कुठे ठेवावे हा त्याचा प्रश्न होता. तथापि, संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराचे गोडावून कामाच्या जागेपासून ५ कि.मीटर अंतरापेक्षा जास्त लांब असल्याचे दाखवून सिमेंट वाहतुकीसाठी दुसरा वाहतूक ठेकेदार नेमून वाहतूक खर्च म्हणून रुपये १३,५०० देण्यात आले. या प्रकरणी जादा रक्कम खर्च झालेली आहे हे विभागीय साक्षीच्या वेळी मान्य करण्यात आले असून जादा प्रदान केलेल्या रकमेपैकी रुपये ३,५४० फक्त वसूल करण्यात आलेले आहेत. **समितीच्या मते ही बाबत गंभीर असल्याने उर्वरित रकमेची विनाविलंब वसुली करण्यात यावी. तसेच या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती विनाविलंब समितीला कळविण्यात यावी अशी शिफारस समितीने आपल्या पहिल्या अहवालात केली होती.**

समितीच्या असेही निदर्शनास आले होते की, एखाद्या बांधकामासंदर्भात जेव्हा निविदा निश्चित करण्यात येतात तेव्हा बांधकामाला लागणारे साहित्य उदा.सिमेंट, वाळू इत्यादी बांधकामाच्या ठिकाणी आणण्यासंदर्भात अट घालण्यात येते की, पाच किलोमीटरच्या आतील अंतरावरुन जर ते आणले तर वाहतूक खर्च कंत्राटदाराला देण्यात येणार नाही. तथापि, उक्त साहित्य जर ५ किलो मीटरची अट अनावश्यक असल्याने निविदेमध्ये ठेवण्याची गरज नाही कारण एकदा निविदेमध्ये अशी अट ठेवल्याने वाहतुकीचे अंतर जास्त दाखवून गैरव्यवहार करण्याची संधी मिळते. सबब, जादा वाहतूक खर्च देण्यासंदर्भात निविदांमध्ये समाविष्ट करण्यात येणारी ५ किलोमीटरची अट काढून टाकण्यात यावी जेणे करुन यापुढे बांधकाम साहित्य बांधकामाच्या ठिकाणी आणण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील अशीही शिफारस समितीने केली होती.

या शिफारशीसंबंधात शासनाने केलेली कार्यवाही :-

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.जी ६१/का-३/७६०, दिनांक २७ ऑक्टोबर, २००० अन्वये कळविणेत आले आहे. संबंधित अधीक्षक अभियंता यांना सूचना मुख्य अभियंता, सा.बा.प्रादेशिक विभाग, पुणे यांच्यातर्फे देणेत आलेल्या आहेत.

जिल्हा परिषदेने संबंधित शाखा अभियंता श्री.पार्लेकर यांचेकडून दिनांक १९ फेब्रुवारी १९९९ रोजी रु.९६०.०० रक्कम व तसेच दिनांक १५ मे १९९९ रोजी रु.३५४० रक्कम अशी एकूण रुपये ४,५०० रक्कम वसूल केली आहे. तसेच शिल्लक रुपये ९,००० रक्कम मक्तेदाराकडून दिनांक २ जून २००३ रोजी वसूल केली आहे. त्यामुळे वसुलीची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

सन १९९९-२००० पासून जिल्हा परिषदेने कोणतीही सिमेंट, स्टील व डांबर खरेदी केलेली नाही. शेड्युल्ड "अ" मध्ये सर्व साहित्य संबंधित मक्तेदार यांनी स्वत: आणून कामे पूर्ण करुन घ्यावयाची आहेत. तेव्हा जिल्हा परिषदेने सदरची अट काढून टाकली आहे.

उपरोक्त लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने अधिक माहिती जाणून घेण्याच्या हेतून दिनांक १२ जून २००३ रोजी सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला अशी माहिती दिली की, प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करताना कंत्राटदाराने वाहतुकीचा खर्च करावयाचा असतो, परंतु या प्रकरणात कंत्राटदाराचे गोडाऊन कामाच्या जागेपासून ५ कि.मी. अंतरापेक्षा जास्त लांब असल्याने त्यांना सिमेंट वाहतुकीसाठी दुसऱ्या कंत्राटदाराची नेमणूक करुन वाहतूक खर्च हा रु.१३,५०० जास्तीचा दाखविलेला आहे. प्रत्यक्षात वाहतुकीचा हा खर्च त्याच कंत्राटदाराने करावयास पाहिजे होता परंतु तो जादा खर्च दाखविल्याने संबंधित शाखा अभियंता व कंत्राटदार यांच्याकडून तो वसूल करण्यात यावा. या प्रमाणे रु.९,००० हे संबंधित कंत्राटदार व रु.४,५०० हे शाखा अभियंता यांच्याकडून म्हणजे एकूण रु.१३,५०० वसुल करण्यात आलेले आहेत. या प्रकरणानंतर जादा वाहतूक खर्च देण्यासंदर्भात निविदांमध्ये समाविष्ट करण्यात येणारी ५ कि.मी. ची अट काढून टाकण्यात आली आहे. पूर्वीच्या पद्धतीमध्ये बदल करण्यात आलेला आहे.

<u>अभिप्राय व शिफारस :</u>

समितीने केलेल्या आग्रही शिफारशींमुळे वाहतूक कंत्राटदाराला प्रदान करण्यात आलेली रु.१३५००/- ची जादा रक्कम वाहतूक कंत्राटदार व शाखा अभियंता या दोघांकडून वसूल करण्यात आली आहे. याबाबत वाहतूक कंत्राटदाराकडून वसुली करण्यात बराच कालावधी लागल्याप्रकरणी समितीने नापसंती व्यक्त करुन भविष्यात जिल्हा परिषदेने आर्थिक वसुली करण्यासाठी कठोरतेने विनाविलंब अंमलबजावणी करावी असे समितीचे मत आहे.

चार : सायकली पुरविणेबाबत. जिल्हा परिषद, नागपूर (लेखा ३.३३)

समितीला प्राप्त झालेल्या एकूण माहितीवरुन असे दिसून येते की, नागपूर जिल्हा परिषदेने इयत्ता ५ वी ते १० वीच्या मुलींना देण्यासाठी ९० टक्के अनुदानावर एकूण ६०४ सायकली मार्च, १९९५ मध्ये खरेदी केल्या या खरेदीसंबंधात निविदा स्वीकारण्यासाठी ज्या दिवशी दुपारी १.०० वाजेपर्यंत वेळ दिलेला होता त्या वेळेला फक्त १ निविदा प्राप्त झाली होती. दुसरी निविदा १ वाजून १० मिनिटांना प्राप्त झाली. ही दुसरी निविदा वेळेनंतर आलेली असल्यामुळे ती स्वीकारण्याची आवश्यकता नव्हती. तथापि, अशाप्रकारे उशिरा आलेली निविदा स्वीकारण्याचा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कोणताही अधिकार नसतांना त्यांनी ती स्वीकारली व नंतर ती उघडण्यात आली. दोन्ही निविदांची तुलना करुन यानंतर आलेल्या निविदेतील दर कमीत कमी असल्याने ती स्वीकारण्यात आली. जिल्हा परिषदेने या संदर्भात निविदा उघडतांना कार्यकारी अधिकारी यांच्याबरोबर मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सभापती, महिला व बालकल्याण समिती व ज्यांच्या निविदा नाकारण्यात आल्या त्या कंपन्यांचे प्रतिनिधी हजर होते व त्यांनी कोणतीही हरकत घेतली नाही असे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. विभागीय सचिवांनी देखील साक्षीच्या वेळी अशा तऱ्हेने उशिरा आलेली दुसरी निविदा उघडणे अयोग्य होते हे मान्य केलेले आहे.

समितीचे असे मत आहे की, या प्रकरणी जिल्हा परिषदेने उशिरा आलेली निविदा न स्वीकारता फेर निविदा मागविण्याची कारवाई करणे आवश्यक होते. असे केले असते तर अधिक निविदा येऊन सायकली खरेदीसाठी स्पर्धात्मक दर मिळू शकले असते. तथापि, तसे न करता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकार मर्यादेचे उल्लंघन करुन उशिरा आलेली निविदा स्वीकारली. त्यामुळे या प्रकरणी अनियमितता झाली आहे असे समितीला ठामपणे वाटते. सबब, या प्रकरणी झालेल्या अनियमिततेबद्दल साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी मान्य केल्याप्रमाणे दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला विनाविलंब कळविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

या शिफारशी संबंधात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास विभागाने असे नमुद केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.,नागपूर यांचेकडून प्राप्त झालेली माहिती व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी या संदर्भात केलेला खुलासा तसेच याबाबतच्या मुळ कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर प्रकरणी १० मिनिटे उशीरा आलेली निविदा उघडण्यात आली ही तांत्रिक चूक झालेली आहे. मात्र उशीरा आलेली निविदा उघडल्यानंतर कमी दराची असल्यामुळे जिल्हा परिषदेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून उशीरा आलेली निविदा उघडण्याची तांत्रिक चूक झाली आहे. सदर बाब पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्र ग्रामविकास विभागास कळविण्यात आले आहे.

ग्रामविकास विभागाने केलेल्या लेखी खुलाशाच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक १२ जून २००३ रोजी सचिव, महिला व बालकल्याण विकास विभाग (अतिरिक्त कार्यभार) यांची साक्ष घेतली. सचिव, महिला व बालकल्याण विकास विभाग यांनी सायकल खरेदीच्या प्रकरणी जिल्हा परिषदेने उशीरा आलेली निविदा त्यांचे दर कमी असल्यामुळे स्विकारली, यामध्ये अनियमितता झाली असल्याच्या समितीच्या मताशी सहमती दर्शवून पुढीलप्रमाणे खुलासा केला. ग्रामविकास विभागाने शासकीय आदेश काढलेला आहे की, निविदा प्रक्रियेमध्ये स्पष्टता आणि पारदर्शकता असावी. या विशिष्ट प्रकरणी निविदा मागविण्यासाठी वेळ मर्यादा दिलेली होती. त्या दिवशी दुपारी १.०० वाजण्याअगोदर एक निविदा प्राप्त झालेली होती. दुपारी १.०० वाजून १० मिनिटांनी नागपूरच्या "केले आणि कंपनीची" निविदा आली. वास्तविक पाहता ही निविदा स्वीकारायला नको होती. ती स्वीकारल्यानंतर उघडायला नको होती. ही निविदा स्वीकारण्याबाबत चूक झाली हा समितीचा आक्षेप बरोबर आहे.

सायकल खरेदी निविदा प्रकरणी अधिक खोलात जाऊन तपास करण्यात आला. या निविदा कोणी तपासल्या, कोणी उघडा असे सांगितले याची चौकशी केल्यानंतर लेखा व वित्त अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी हे दोघेही या प्रकरणी प्रथम दर्शनी जबाबदार आहेत असे दिसून आले. याबाबतीत आयुक्त, महिला आणि बालकल्याण विकास विभाग यांच्यामार्फत जिल्हा परिषदेला विचारणा करण्यात आली. जिल्हा परिषद, नागपूर यांनी या संबंधित लेखा व वित्त अधिकाऱ्याकडे विचारणा केली की, याबाबत आपण योग्य तो सल्ला का दिला नाही ? लेखा व वित्त अधिकाऱ्यांच्या स्पष्टीकरणाकवरून असे दिसून येते की, निविदा प्राप्त झाल्यानंतर त्या उघडण्याच्या शिफारशीची नस्ती लेखा व वित्त अधिकाऱ्यामार्फत केली नाही. ती त्यांना न दाखविता संबंधित अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश दिले की, "कॅफोच्या समोर उघडा" हे मराठी भाषांतर आहे. याचा अर्थ असा होतो की, कॅफो समोर असेल त्या वेळी निविदा उघडा म्हणून कॅफो आणि इतर पदाधिकारी समोर असताना निविदा उघडण्यात आली. योगायोगाने ही उशीरा मिळालेली निविदा कमी दराची होती. वास्तविक पाहता ती निविदा उघडायलाच नको होती. ही निविदा उघडल्यानंतर ती कमी दराची होती म्हणून जिल्हा परिषदेच्या निर्णय प्रक्रियेनुसार त्यांना आदेश देण्यात आले. संचालक, लेखा व कोषागारे यांचा या प्रकरणी अभिप्राय घेण्यात आला. कारण लेखा व वित्त अधिकारी हे संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अखत्यारीत येतात. त्यांच्या अभिप्रायानुसार ही जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे जाते. निविदा उघडण्याच्या प्रकरणी लेखा व वित्त अधिकारी दोषी नाही असा त्यांनी अभिप्राय दिला. या ठिकाणी झालेली ही तांत्रिक चूक आहे. यामुळे शासनाचे आणि जिल्हा परिषदेचे देखील सकृत दर्शनी नुकसान झालेले नाही. तरी देखील ती चूकच आहे. याबाबत कारवाई करण्यासाठी ग्रामविकास विभागास सांगण्यात आले होते. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी भारतीय प्रशासन सेवेतील असल्यामुळे त्यांना सामान्य प्रशासन विभागाकडे संदर्भीत करावे असे सांगण्यात आले. त्यानुसार त्यांना सामान्य प्रशासन विभागाकडे संदर्भीत करण्यात आलेले आहे.

९

<u>अभिप्राय व शिफारशी :</u>

जिल्हा परिषदांमधून विविध कामांच्या निविदा प्रक्रियेत पारदर्शकता व स्पष्टता आणण्यासाठी वेळेचे व इतर नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे जेणेकरुन अनियमितता व गैरव्यवहार होणार नाही. सायकल खरेदी प्रकरणी जिल्हा परिषदेने १० मिनिटे उशीराने आलेली निविदा स्वीकारुन ती उघडली ही तांत्रिक चूक विभागीय सचिवांनी मान्य केली आहे. सायकली पुरविणाऱ्या "केले आणि कंपनीची" निविदा वेळेनंतर एक तास उशीराने आलेली निविदा स्वीकारुन ती उघडण्याच्या प्रकरणी झ ालेल्या अनियमिततेबाबत ग्रामविकास विभागाने नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित केली आहे. त्यामुळे पुढे चौकशीअंती त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे याबाबतचा अहवाल समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावा. अनियमितता व गैरव्यवहार होऊ नये म्हणून यापुढे निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता व स्पष्टता असण्याच्या दृष्टीने नियमाचे काटेकोर पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

पाच : प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अंडी वाटपाबाबत. जि.प.नागपूर (३.८५)

सन १९९४-९५ मध्ये नागपूर जिल्हा परिषदेने 'शालेय पोषण आहार' योजने अंतर्गत प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना उकडलेली अंडी देण्याचे ठरविले. या योजनेसाठी एकंदर ३४ लाख रुपये खर्च करण्यात येणार होते. त्यापैकी रुपये १३.६६ लाख इतका खर्च करण्यात आला.

समितीने नागपूर जिल्हा परिषदेची तपासणी केली असता असे आढळून आले की, याप्रकरणी घातलेल्या अटीनुसार अनेक शाळांमध्ये रोजच्या रोज अंडी पुरविण्यात येत नव्हती. तर एकदम १५ दिवसांनी अंडी पुरविली गेली. त्यामुळे लेखा परिक्षकांनी आपल्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे अंडी १५ दिवस ताजी कशी राहिली ? १५ दिवसांपर्यंत अंडी ठेवण्याची व्यवस्था कोठे करण्यात आली असा प्रश्न समितीलाही पडला. समितीने सावनेर, नागपूर, उमरेड या पंचायत समितीत या योजनेची तपासणी केली. उमरेड पंचायत समिती अंतर्गत १६ ते ३१ मार्च, १९९५ मध्ये प्रत्यक्षात अंडी प्राप्त न होताच ती प्राप्त झाल्याच्या शिक्षकांनी खोट्या स्वाक्षऱ्या केल्या. त्यामुळे कंत्राटदाराला अंडी न पुरविताच रुपये २०,७६५ दिले गेले. त्याचप्रमाणे पंचायत समिती, रामटेक, काटोल व नरखेड याठिकाणी अंडी पुरविण्यामध्ये गैरव्यवहार झाला आहे. नागपूर जिल्हा परिषदेमध्ये समितीने घेतलेल्या वेळी संबंधित शिक्षक व कंत्राटदार यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीस आश्वासन दिले.

समितीने अंडी पुरविण्यात झालेल्या गैरव्यवहाराबाबत सचिव, महिला व बालकल्याण विभाग यांच्या साक्षीच्या वेळी सचिवांनी अंडी पुरवठ्याच्या बाबतीत समितीने निदर्शनास आणलेला गैरव्यवहार झाला असल्याचे मान्य केले व याप्रकरणी अशी अधिक माहिती दिली की, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अंडी वाटप करण्याच्या योजनेसंदर्भात या कार्यक्रमांतर्गत एका अंड्याचा खर्च प्रतिदिनी एक रुपया मर्यादित असतानाही प्रत्यक्षात नागपूर जिल्हा परिषदेकडून रुपये ३.५० इतका खर्च लाभार्थ्यांमागे करण्यात आला ही एक फार मोठी अनियमितता याप्रकरणी झाली असल्याचे सचिवांनी समितीस सांगितले.

नागपूर जिल्हा परिषदेने प्राथमिक शाळांना अंडी पुरविण्याची राबविलेली ही योजना संपूर्ण प्रकारे निष्फळ वार झालीच शिवाय या योजनेमध्ये अनेक प्रकारे गैरव्यवहार होऊन अंडी पुरवठादाराला अंडी पुरवठा झाल्याचा प्रत्यक्षात आढावा न घेता रुपये १३.६६ लाख इतकी रक्कम अदा केली गेली. उमरखेड पंचायत समिती अंतर्गत प्रत्यक्षात अंडी न पुरविली असताना ४३ शाळांतील शिक्षकांनी दररोज अंडी पुरवठा झाल्याबाबतच्या खोट्या स्वाक्षऱ्या केल्याचा प्रकार समितीला अत्यंत आक्षेपार्ह व गंभीर वाटतो. लहान कोवळ्या मुलांच्या तोंडचा घास काढून घेऊन ती रक्कम स्वाहा करण्याचा हा प्रकार भयानक आहे.

साक्षीच्या वेळी सचिव, महिला व बाल कल्याण यांनी नागपूर जिल्हा परिषदे अंतर्गत राबविल्या गेलेल्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना अंडी पुरवठा करण्याच्या योजनेत असे अनेक प्रकारचे गैरव्यवहार झाल्याचे

मान्य केले. त्यामुळे समितीने सचिव पातळीवर या संपूर्ण प्रकारची चौकशी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत **व्यक्त केले असल्याने समिती अशी शिफारस करीत आहे की, सचिवांनी समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे या गंभीर प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन संबंधित जिल्हा परिषदेचे जे जे अधिकारी/कर्मचारी, शिक्षक व कंत्राटदार या गैरव्यवहाराला कारणीभूत आहेत, त्यांचेवर कारवाई करावी. ती कारवाई व चौकशीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा अशी शिफारस समितीने आपल्या पहिल्या अहवालात केली होती.**

दिनांक १२ जून २००३ रोजी सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी याप्रकरणी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीसमोर पुढीलप्रमाणे खुलासा केला. ग्रामीण विभागातील शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहार कार्यक्रमाखाली अंडी पुरवठ्यासंबंधीचा मूळ शासन निर्णय ग्रामविकास विभागाचा होता. या शासन निर्णयात असे नमूद करण्यात आले आहे की, या कार्यक्रमांतर्गत लागणारी अंडी सहकारी कुक्कुटपालन संस्थेकडून व इतर सहकारी संस्थांकडून जाहिररित्या निविदा मागवून खरेदी करण्यात यावी व उकडलेल्या अंड्यांचे दर निश्चित करण्यात यावे. ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार सदर योजना १९९३-९४ या वर्षात राबविणे आवश्यक होते. परंतु १९९३-९४ मध्ये ही योजना राबविण्यात आली नाही. १९९४-९५ या वर्षात जुलै ९४ पासून योजना राबविण्याच्या हेतूने मे १९९४ मध्ये कार्यवाही करण्यात आली. अंडी पुरवठ्याकरिता दूध पुरवठा होत नसलेल्या ८८६ शाळांची निवड करण्यात येऊन ४१,७०४ विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात आली. यापैकी ३०१ शाळांना सुकडी पुरविण्याचे ठरवून ५८५ शाळांना अंडी पुरवठा करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. सदर टिप्पणी सादर केल्यानंतर मुख्यलेखा व वित्त अधिकाऱ्यांनी खुलासा मागितला होता.

पुरवठादार आणि शाळेतील शिक्षकांच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली असून केलेल्या कारवाईची माहिती मी देऊ इच्छितो. पुरवठादारास शिक्षणाधिकाऱ्यांनी कच्ची अंडी पुरविल्याबाबत रुपये १,५९,८७९ व २५ दिवस वाहतूक न करता केवळ २ दिवस वाहतूक केल्याबाबत रुपये ६,२५,१२६ असे एकूण रुपये ७,८५,००५ त्याचेकडून वसुलपात्र असून रक्कम भरावयास पत्र दिले होते. सदर रक्कम पुरवठादाराने विहीत कालावधीत न भरल्याने त्याचे विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावयास शिक्षणाधिकारी यांनी पोलीस स्टेशन, सदर, नागपूर येथे प्रकरणाचा तपशील कळविला. त्यानुसार एफ.आय.आर. नोंदविण्यात आला. उमरखेड पंचायत समिती अंतर्गत ४३ शाळेतील शिक्षकांपैकी सेवानिवृत्त झालेले शिक्षक वगळून ३३ शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. पंचायत समिती, उमरखेड येथील ४३ शिक्षकांकडून रु.२०,७६५ वसुल पात्र ठरले. सदर वसुली पूर्ण झालेली आहे. त्या व्यतिरिक्त ३३ निलंबित शिक्षकांपैकी चौकशी अंती २७ शिक्षक दोषी आढळून आले त्यांच्याकडून वरील रक्कम वसुली नंतर त्यांचेवर एक वेतन वाढ गोठविण्याची कार्यवाही करण्यात आली. ३ शिक्षक नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचे शिक्षेत अंशत: बदल करुन ठपका ठेवण्यात आला. एका शिक्षकाच्या विभागीय चौकशी अंती ३ वार्षिक वेतनवाढी गोठविण्यात आल्या. एक शिक्षक विभागीय चौकशी दरम्यान सेवानिवृत्त झाल्याने रक्कम वसुलीची कार्यवाही करण्यात आली. एका शिक्षकावर आरोप सिद्ध झालेला नाही.

<u>अभिप्राय व शिफारशी :</u>

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना उकडलेली अंडी देण्याची योजना राबविण्यात आली होती. या योजनेत कच्ची अंडी पुरविल्याबाबत रु.१,५९,८७९ व २५ दिवस वाहतूक न करता केवळ २ दिवस वाहतूक केल्याबाबत रुपये ६,२५,१२६ असे एकूण रक्कम रु.७,८५,००५ चा गैरव्यवहार केलेला आहे. ही वसुलपात्र रक्कम अंडी पुरवठादाराने विहित कालावधीत जिल्हा परिषदेकडे भरावी म्हणून त्यांना पत्र दिले होते. परंतु अंडी पुरवठादाराने ही रक्कम न भरल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास लवकरात लवकर पूर्ण करुन अंडी पुरवठादारावर कठोर कारवाई करण्यात यावी व त्यांच्याकडून ७ लाख ८५ हजार ५ रुपये व्याजासहित वसूल करण्यात यावेत. तसेच अंडी पुरवठादाराला काळ्या यादीत समावेश करुन यापुढे शालेय पोषण आहारातील अंडी वाटपाचा ठेका देऊ नये इतकेच नव्हे तर शासनाच्या कोणत्याही योजनेतील ठेका सदर ठेकेदारास देण्यात येऊ नये. तसेच शिक्षण अधिकारी यांनी पोलीस ठाणे, सदर, नागपूर येथे गुन्ह्याची नोंद केल्यानंतर पुरवठादाराविरुद्ध कोणत्या स्वरुपाचा आरोप ठेवण्यात आला आणि त्यांच्याविरुद्ध कोणत्या कलमाखाली गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे ? सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास, तपासात काय निष्पन्न झाले. त्यांच्याविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे काय, याबाबतची परिपूर्ण माहिती एका महिन्यात समितीला पाठवावी.

सहा : बनपूरी-नगरधन रस्त्याचे बांधकामातील अनियमितता. जि.प.,नागपूर (३.१६४)

नागपूर जिल्हा परिषदे अंतर्गत बनपूरी-साटक या दोन किलोमीटर रस्त्याचे काम १९९१-९२ ते १९९४ या कालावधीत पूर्ण करण्यात आले. प्रत्यक्षात मंजूर प्राकलनाप्रमाणे सदर रस्त्याचे काम बनपुरी-बेलडोंगरी-नगरधन असे आहे. या रस्त्याच्या चार किलोमीटर लांबीपैकी क्रमांक ३ व ४ किलोमीटरचे काम रोजगार हमी योजनेंतर्गत नगरधन व बेलडोंगरी या नावाने १९८३ साली मंजूर झालेले होते व हे काम रोजगार हमी योजनेंतर्गत पूर्ण करण्यात आल्यामुळे प्रत्यक्षात बनपुरी ते बेलडोंगरी दोन किलोमीटर आणि बनपूरी ते साटक दोन किलोमीटर असा रस्ता बांधण्यात आला. बनपूरी ते साटक या रस्त्याच्या कामाला अगोदर मंजुरी देण्यात आलेली नव्हती. या कामावर झालेल्या रुपये १,६७,५८९ च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव अलीकडेच शासनाकडे पाठविण्यात आला आहे. ही मंजुरी मागण्यास पाच वर्षांचा विलंब झाला आहे. समितीला याप्रकरणी असे दिसून आले की, शासनाची कोणतीही परवानगी न घेता मूळ प्राकलनात बदल करुन जादा खर्च करण्यात आला. मात्र या खर्चास लवकरात लवकर कार्योत्तर मंजुरी घेण्याची आवश्यकता संबंधित अधिकाऱ्यांना वाटत नाही. याबाबत कार्योत्तर मंजुरी घेण्यास जो पाच वर्षांचा विलंब झाला आहे त्याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. सदर प्रस्ताव पाठविण्यास ज्या अधिकाऱ्यांनी विलंब केला त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला विनाविलंब देण्यात यावी.

सदर रस्त्याच्या कामासंदर्भात साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांकडून समितीला असे सांगण्यात आले आहे की, एकच निविदा आली असली आणि ते अपेक्षेइतकी वा किमान दराची असली तरी ती स्वीकारता येते. त्यातही ५ टक्के अथवा रुपये ५० हजार पर्यंत जास्तीची निविदा स्वीकारता येते.

या संदर्भात समितीला असे दिसून आले आहे की, कोणत्याही कामासाठी निविदा स्वीकारण्याबाबत शासनाच्या नियमात कोणतीही स्पष्टता व नि:संदिग्धता नाही. परिणामी एकच निविदा आली तर ती स्वीकारावयाची की नाही असा अनेक ठिकाणी प्रश्न पडतो. किंबहुना ती स्वीकारली जाते व वर उल्लेखिल्याप्रमाणे कामाच्या गुणवत्तेवर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. यावर उपाय म्हणून समितीचे असे मत आहे की, याबाबत नियमात स्पष्ट तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता शासनाने निविदा स्वीकारण्यासंबंधातील नियमांमध्ये सुस्पष्ट व नि:सदिग्ध तरतूद करावी व त्याबाबतचे परिपत्रक सर्व जिल्हा परिषदांना पाठविण्यात यावे व या परिपत्रकाची एक प्रत समितीला पाठविण्यात यावी. समिती त्याप्रमाणे शिफारस करीत आहे.

सदरहू रस्त्याच्या कामासाठी मुळ निविदेतील तरतुदीनुसार ५२० गोणी सिमेंट ठेकेदाराला देण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात या कामासाठी केवळ ४५० गोणी सिमेंट लागले आणि उरलेले ७० गोणी सिमेंट ठेकेदाराकडून परत घेणे आवश्यक होते, त्यापैकी प्रत्यक्षात फक्त ३० गोणी सिमेंट परत घेण्यात आले व ४० गोणी सिमेंट परत घेण्यात आलेले नाही. या ४० गोणी सिमेंटचा कागदोपत्री कुठेही हिशेब लागत नसल्याने त्याबाबत ठेकेदाराकडून

वसुली करुन घेण्यात आली आहे. हे ४० गोणी सिमेंट दुसऱ्या कामावर वापरण्यात आले असल्याचे साक्षीच्या वेळी समितीला सांगण्यात आले. तथापि, तशी कागदोपत्री कुठेही नोंद नसल्याने याप्रकरणी निश्चितच अपहार झाला आहे असे समितीचे ठाम मत झाले आहे. सबब साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे संबंधित कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला विनाविलंब पाठविण्यात यावा.

या शिफारशी संबंधात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत सार्वजनिक बांधकाम विभागाने असे नमूद केले की, नागपूर जिल्हा परिषदे अंतर्गत बनपूरी-साटक या रस्त्याचे दोन कि.मी.चे अर्थसंकल्पाबाहेरील काम सन १९९१-९२ मध्ये पूर्ण केले असून सदर कामाचा कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव २३ सप्टेंबर १९९८ मध्ये शासनास प्राप्त झाला. सदर प्रस्ताव पाठविण्यासंबंधी झालेल्या विलंबाबाबत संबंधितांचे स्पष्टीकरण घेतले असता, श्री.एस.जी. आनंदीकर, तत्कालीन कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद हेच प्रामुख्याने जबाबदार असल्याचे निदर्शनास आले म्हणून त्यांचेविरुद्ध दिनांक २५ मार्च २००३ च्या आदेशान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

सदरहू रस्त्याचे कामावर आवश्यकतेनुसार वेळोवेळी संबंधित कंत्राटदारास मागणी पत्राच्या अनुषंगाने उप विभागामार्फत सिमेंटचा पुरवठा करण्यात आला होता. सदर कामाचे अंतीम देयक कंत्राटदारास अदा करते वेळी करारनाम्याप्रमाणे कंत्राटदारास दिलेल्या साहित्याच्या पुरवठ्यासंबंधी शहानिशा करुन, अंतिम दयक अदा करणे आवश्यक होते. सदर कामाचे अंतिम देयक श्री.उमाटे, शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले असून श्री.आसरानी, उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बां.) उप विभाग, रामटेक यांनी तपासले आहेत. तद्नुसार श्री.सु.ल.हेटे, कार्यकारी अभियंता यांनी अंतिम देयक पारीत केले आहे. श्री.उमाटे यांनी अंतिम देयक सादर करताना ४० गोणी सिमेंटची वसूली अंतिम देयकातून प्रस्तावित करणे क्रमप्राप्त होते परंतु अंतिम देयकामध्ये ही वसूली श्री.उमाटे, शाखा अभियंता यांनी प्रस्तावित केलेली नव्हती. त्यामुळे ४० गोणी सिमेंटच्या अती प्रदानास श्री.उमाटे, शाखा अभियंता हे जबाबदार आहेत. श्री.उमाटे, शाखा अभियंता हे जिल्हा परिषदेचे कर्मचारी असल्याने ४० गोणी प्रती रुपये ६६ प्रमाणे एकूण रुपये २,६४० वसुल करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

श्री.सु.ल.हेटे, कार्यकारी अभियंता हे फेब्रुवारी १९९९ व श्री.जी.जी.असरानी हे सप्टेंबर, १९९७ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत त्यांचेविरुद्ध नियमानुसार विभागीय चौकशी करता येत नाही.

दिनांक १२ जून, २००३ रोजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांनी साक्षीच्या वेळी समितीसमोर खुलासा केला की, बनपुरी-नगरधन रस्त्याच्या बांधकामामध्ये श्री.एस.जी.आनंदीकर, कार्यकारी अभियंता हे दोषी आढळलेले आहेत त्यांच्यावर सचिव पातळीवर चौकशी करण्यात येत असून दोषारोप पत्र दाखल करुन चौकशीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे व पुढील एक महिन्यात या प्रकरणाची कारवाई पूर्ण होईल.

कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, नागपूर यांनी बनपूरी-नगरधन रस्त्याच्या बांधकामात कोणत्या पातळीवर व कोणामुळे विलंब लागला याबाबतची लेखी माहिती खालीलप्रमाणे समितीला दिली आहे.

बनपूरी-नगरधन रस्त्याच्या प्रस्ताव मंजुरीसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. ३२४८/९०, दिनांक ६ ऑक्टोबर १९९० अन्वये सादर करण्यात आला. परंतु मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम खाते, नागपूर प्रादेशिक विभाग नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. १८५३, दिनांक १० एप्रिल १९९१ नुसार मुळ मंजुर प्रस्तावामध्ये बदल करण्याचे अधिकार क्षेत्रिय अधिकाऱ्यांना नसल्यामुळे प्रस्ताव मान्य करता येत नाही याकरिता सुस्पष्ट मंजुरीसाठी शासनास सादर करावा असे निर्देश दिले होते.

दिनांक १९ जून १९८८ ते ११ फेब्रुवारी १९९३ या कालावधीत श्री.आनंदीकर, कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम विभागात कार्यरत होते. मुख्य अभियंता यांचे दिनांक १० एप्रिल १९९१ च्या पत्रात निर्देशीत केल्याप्रमाणे सुधारीत प्रस्ताव त्यांनी दिनांक ११ फेब्रुवारी १९९३ पर्यंत म्हणजे ते कार्यरत असेपर्यंत सादर केलेला नाही. म्हणजेच सुधारित प्रस्ताव सादर करण्यास झालेल्या विलंबास श्री.आनंदीकर, कार्यकारी अभियंता हे जबाबदार आहे.

श्री.पु.ल.कडू, कार्यकारी अभियंता यांनी कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. ४२१६ दिनांक २३ जानेवारी १९९८ अन्वये अधिक्षक अभियंता, सा.बा.मंडळ, नागपूर यांच्याकडे सादर केला.

याबाबतची माहिती या कार्यालयाचे पत्र क्र. जिपना/बांध/पंरास/१५०७/२००३, दिनांक २४ एप्रिल २००३ अन्वये कार्यासन अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे.

<u>अभिप्राय व शिफारशी :</u>

नागपूर जिल्हा परिषदे अंतर्गत बनपुरी-नगरधन या रस्त्याच्या बांधकामातील बनपूरी-साटक या दोन किलोमीटर रस्त्याचे बांधकाम सन १९९१-९२ ते १९९४ या कालावधीत पूर्ण करण्यात आले. प्रत्यक्षत मंजूरी मिळाल्याप्रमाणे सदर रस्त्याचे काम बनपुरी-बेलडोंगरी-नगरधन असे आहे. या रस्त्याचे ४ कि.मी. लांबीपैकी क्र.३ व ४ कि.मी.चे काम रोजगार हमी योजने अंतर्गत नगरधन-बेलडोंगरी या नावाने १९८३ साली मंजूर झाले होते व हे काम रोजगार हमी योजने अंतर्गत पूर्ण करण्यात आल्यामुळे प्रत्यक्षात बनपुरी ते बेलडोंगरी २ कि.मी. आणि बनपुरी ते साटक २ कि.मी. असा रस्ता बांधण्यात आला. बनपुरी ते साटक या रस्त्याच्या बांधकामाला

अगोदर मंजुरी देण्यात आली नव्हती. या कामावर झालेल्या रु.१ लाख ६७ हजार पाचशे ८९ च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळण्याबाबतच्या प्रस्तावास पाच वर्षांचा विलंब झाला आहे. या विलंबास कार्यकारी अभियंता श्री.आनंदीकर हे जबाबदार असल्याचे सचिवांनी मान्य केले आहे. परंतु अद्याप त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई केलेली आढळून आलेली नाही. समितीने याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली असून विलंबास जबाबदार असलेल्या कार्यकारी अभियंता श्री.आनंदीकर हे सेवेत कार्यरत आहेत. त्यामुळे जाणूनबुजून त्यांच्यावर कारवाई करण्यास विलंब होत असल्याची शंका रास्त वाटते. याबाबत समितीने केलेल्या शिफारशीनुसार तात्काळ विनाविलंब कारवाई करुन याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावा.

सात : पाटणसवंगी वाकी रोड पृष्ठभागाच्या मजबुतीकरणाबाबत जि.प.,नागपूर (३.१६५)

पाटणसवंगी-वाकी रोड रस्त्याच्या पृष्ठ भागाच्या मजबुतीकरणाबाबतच्या निविदेच्या मंजुरीचा प्रस्ताव हा नागपूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीमार्फत स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी जाणे आवश्यक होते. या रस्त्याच्या पृष्ठ भागाच्या मजबुतीकरणासंबंधातील आलेली निविदा बांधकाम समितीकडे न जाता थेट जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यात आली. खरे पाहता निविदासंबंधातील मंजुरीचे प्रस्ताव बांधकाम, स्थायी समिती आणि सर्वसाधारण सभा अशा तीन स्तरातून मंजुरीसाठी जाणे आवश्यक आहे. नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना उक्त रस्त्याच्या मजबुतीकरणासंबंधीची निविदा मंजुरीसाठी बांधकाम समिती पुढे का ठेवण्यात आली नाही ? अशी विचारणा केली असता नागपूर जिल्हा परिषदेमध्ये अशा प्रकारची प्रथा नाही असे समितीला सांगण्यात आले.

जिल्हा परिषदांमध्ये निविदांच्या मंजुरीसंबधातील प्रस्ताव बांधकाम समिती, स्थायी समिती आणि जनरल बॉडी मध्ये ठेवून ते मंजूर करुन घेण्यात येतात. नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत अशी पद्धत का अवलंबिण्यात आली नाही याबाबत समितीला आश्चर्य वाटते. **समितीच्या मते, अशाप्रकारे वाटेल त्या पद्धती अवलंबिल्यास अनावस्था प्रसंग ओढवण्याची शक्यता असल्याने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये या संबंधात समान पद्धती अवलंबिली जाणे आवश्यक असल्यामुळे, सर्व जिल्हा परिषदांमध्ये असे प्रस्ताव बांधकाम समिती, स्थायी समिती आणि जनरल बॉडीमध्ये ठेवून ते मंजूर करुन घेण्यात यावेत अशा प्रकारचे एक परिपत्रक विभागाने सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर त्याची एक प्रत विनाविलंब समितीला पाठविण्यात यावी.**

दिनांक १२ जून २००३ रोजी सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीसमोर पुढीलप्रमाणे खुलासा केला. जिल्हा परिषदेमध्ये वेगवेगळ्या प्राधिकार आहेत त्यांचे आर्थिक अधिकार त्यांच्या पातळीवर ठरलेले आहेत. पंचायती राज समितीची शिफारस होती की, बांधकाम समिती, स्थायी समिती व सर्वसाधारण सभेकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा. टेंडर पास करण्यासंबंधी प्रत्येक समितीकडे प्रस्ताव पाठवावयाचा झाला तर वेळ लागण्याची शक्यता असते. तसेच प्रत्येक समितीचे मंजुरीसाठीचे अधिकार वाढविण्यात आले आहेत. प्रत्येक प्लॅन जनरल बॉडीमधून मंजूर होऊन खर्चाच्या आकडेवारीप्रमाणे प्रस्ताव त्या त्या समितीकडे मंजुरीसाठी पाठविले जातात. त्यामुळे समितीच्या शिफारशीप्रमाणे कारवाई करण्याची गरज नव्हती असे शासनाचे मत आहे.

अभिप्राय व शिफारशी :

अभिप्राय नाही.

परिशिष्ट " अ "

पंचायत राज समितीच्या बैठकीस योग्य व सविस्तर माहिती देणेबाबत तसेच माहिती पुरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
परिपत्रक क्रमांक पंरास.२००३/प्र.क्र.१३५/पं.रा.५ (३८)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जून २००३.

परिपत्रक

पंचायत राज समितीने जिल्ह्यांच्या भेटीवर आधारित प्रलंबित मुद्यांवर प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्या साक्षीमध्ये असे निदर्शनास आणले की, समिती जेव्हा जिल्हा परिषदांना भेटी देते तेव्हा त्यांना तेथील अधिकाऱ्यांकडून एखाद्या प्रकरणातील संपूर्ण व सविस्तर माहिती दिली जात नाही. तसेच या बैठकीत जिल्ह्यातील अधिकाऱ्याकडून काही मुद्यांवर विहित कालावधीत माहिती पाठविण्याचे आश्वासन दिले जाते, मात्र ही माहिती सुध्दा जिल्हा परिषदांकडून समितीस प्राप्त होत नाही, हे योग्य नाही. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते आहे की, पंचायत राज समिती ही महाराष्ट्र विधान मंडळाची महत्त्वाची समिती असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाची पाहणी करण्याचे व झालेली अनियमितता टाळण्याबाबत मार्गदर्शन करण्याचे महत्वाचे काम या समितीकडे आहे. त्यामुळे समितीच्या भेटीच्या वेळी, त्यांनी विचारलेल्या मुद्यांवर सविस्तर व स्पष्ट वस्तुस्थितीदर्शक माहती समितीस देणे बंधनकारक आहे. मोघम आणि दिशाभूल करणारी माहिती समितीस देणे टाळून उपस्थित मुद्यांवरील संपूर्ण माहिती जबाबदारीने समितीस देण्यात यावी. अशी माहिती दिली गेली नाही तर, तो समितीचा हक्कभंग ठरतो. तरी असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा परिषदांनी पंचायत राज समितीच्या भेटीच्या वेळी समितीस आवश्यक सर्व माहिती सविस्तरपणे देणे बंधनकारक आहे. तसेच समितीच्या बैठकी दरम्यान चर्चेमध्ये माहिती पाठविण्याबाबत समितीकडून जी मुदत देण्यात आलेली आहे, त्या मुदतीत समितीकडे माहिती पाठविणे जिल्हा परिषदांना बंधनकारक आहे. त्यामुळे यापुढे पंचायत राज समितीच्या भेटी दरम्यान समितीस माहिती देणे

व माहिती पाठविणे याबाबत काटेकोर दक्षता घेऊन कालमर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे. यात त्रुटी आढळल्यास अथवा अनियमितता झाल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील, असेही कळविण्यात येत आहे.

या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

एस.एस.हुसैन,
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) विभागीय आयुक्त (सर्व),
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
(३) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (पंचायत राज समिती), विधान भवन, मुंबई.

परिशिष्ट " ब "

बैठक : दिनांक १२ जून २००३

स्थळ : विधान भवन, मुंबई.

वेळ : दुपारी ११-३० ते दुपारी ०१-३०

उपस्थित सदस्य

(१) श्री.राजन पाटील, वि.स.स. (समिती प्रमुख)
(२) श्री.जयंत ससाणे, वि.स.स.
(३) श्री.अविनाथ वारजूकर, वि.स.स.
(४) श्री.अमर काळे, वि.स.स.
(५) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स.
(६) श्री.रोहिदास चव्हाण, वि.स.स.
(७) श्रीमती.मनिषा निमकर, वि.स.स.
(८) श्री.प्रतापराव जाधव, वि.स.स.
(९) श्री.गणपत कदम, वि.स.स.
(१०) श्री.ज्ञानेश्वर धाने-पाटील, वि.स.स.
(११) श्रीमती.शोभाताई फडणवीस, वि.स.स.
(१२) श्री.रामचंद्र नावंदिकर, वि.स.स.
(१३) श्री.मधुकर कुकडे, वि.स.स.
(१४) श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.प.स.
(१५) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव,
(२) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव,
(३) श्री.नि.वि.कवळे, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक.

मंत्रालयीन विभाग

श्री.एस.एस.हुसैन, सचिव, ग्रामविकास विभाग.

श्री.एस.एस.मोमिन, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत)

श्री.व्ही.पी.बोरगे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते)

श्री.प्रभाकर देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर.

श्री.मृणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने पहिल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात सचिव, ग्रामविकास; सचिव, बांधकाम विभाग; सचिव, जलसंधारण विभाग; सचिव, पाटबंधारे विभाग यांची साक्ष घेतली.

बैठक : दिनांक १८ जून २००३

स्थळ : विधान भवन, मुंबई.

वेळ : दुपारी ११-३० ते दुपारी ०१-३०

उपस्थित सदस्य

(१) श्री.राजन पाटील, वि.स.स. (समिती प्रमुख)
(२) श्री.जयंत ससाणे, वि.स.स.
(३) श्री.नरेशचंद्र ठाकरे, वि.स.स.
(४) श्री.अविनाथ वारजूकर, वि.स.स.
(५) श्री.अमर काळे, वि.स.स.
(६) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स.
(७) श्री.रोहिदास चव्हाण, वि.स.स.
(८) श्रीमती.मनिषा निमकर, वि.स.स.
(९) श्री.गणपत कदम, वि.स.स.
(१०) श्री.ज्ञानेश्वर धाने-पाटील, वि.स.स.
(११) श्री.खोमेश्वर रहांगडाळे, वि.स.स.
(१२) श्री.मधुकर कुकडे, वि.स.स.
(१३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.प.स.
(१४) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.
(१५) श्री.बळवंतराव ढोबळे, वि.प.स.
(१६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव.
(२) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव.
(३) श्री.नि.वि.कवळे, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक.

मंत्रालयीन विभाग

(१) श्री.बी.सी.खटूआ, सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.

(२) श्रीमती माधुरी तळाशीकर, उप सचिव, पाटबंधारे विभाग.

(३) श्रीमती कुंदा गोसावी, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने पहिल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग; सचिव, पाटबंधारे विभाग यांची साक्ष घेतली.

बैठक : दिनांक २ जुलै २००३

स्थळ : विधान भवन, मुंबई.

वेळ : दुपारी १-०० ते दुपारी २-००

उपस्थित सदस्य

(१) श्री.जयंत ससाणे, वि.स.स.
(२) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
(३) श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स., कार्यकारी समिती प्रमुख
(४) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स.
(५) श्री.रोहिदास चव्हाण, वि.स.स.
(६) श्री.गणपत कदम, वि.स.स.
(७) श्री.ज्ञानेश्वर धाने-पाटील, वि.स.स.
(८) श्री.खोमेश्वर रहांगडाळे, वि.स.स.
(९) श्री.रामचंद्र नावंदिकर, वि.स.स.
(१०) श्री.मधुर कुकडे, वि.स.स.
(११) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.प.स.
(१२) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव,
(२) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव,
(३) श्री.नि.वि.कवळे, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक.

मंत्रालयीन विभाग

(१) श्री.कुणाल कुमार, मु.का.अ., जि.प., नागपूर.
(२) श्री.आर.एन.देशमुख, सह सचिव, पाणीपुरवठा विभाग.

(३) श्रीमती माधुरी तळाशीकर, उप सचिव, पाटबंधारे विभाग.

(४) श्री.एस.एस.साठविलकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग.

(५) श्री.पु.ही.वागदे, अवर सचिव, पाणीपुरवठा विभाग.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने पहिल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर; सह सचिव, पाणीपुरवठा विभाग; उप सचिव, पाटबंधारे विभाग; उप सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बैठक : दिनांक २९ नोव्हेंबर २००३

स्थळ : विधान भवन, मुंबई.

वेळ : दुपारी १-०० ते दुपारी १-३५

उपस्थित सदस्य

(१) श्री.संपतराव पवार-पाटील, वि.स.स., (कार्यकारी समिती प्रमुख)
(२) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
(३) श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.
(४) श्री.खोमेश्वर रहांगडाळे, वि.स.स.
(५) श्री.रामचंद्र नावंदिकर, वि.स.स.
(६) श्री.मधुकर कुकडे, वि.स.स.
(७) श्री.मदन पाटील, वि.प.स.
(८) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव,
(२) श्री.शं.तु.गावडे, अवर सचिव,
(३) श्री.नि.वि.कवळे, कक्ष अधिकारी.

मुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा कार्यालय)

श्री.सी.जी.पवार, मुख्य लेखा परीक्षक.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने पहिल्या अनुपालन अहवालाच्या प्रारूपावर विचार करून काही सुधारणांसह संमत केला.